साप्ताहिक
# सहकारनामा

●Regd.No.MAHMAR49983 ●Declaration No.SDM/SR/01.2020, Dt.21/10/2020
Email :saharnamanews@gmail.com

संपादक – श्री.अब्बास इसाक शेख मोबा.९०९६७७७५०

वर्ष-१ ले | अंक – ५ वा | सोमवार दिनांक १८ जानेवारी २०२१ ते २४ जानेवारी २०२१ | पाने – ८ | किंमत ३ रु.


## उद्याच्या ग्रामपंचायत निकालाकडे लागले सर्वांचे लक्ष,

# उमेदवारांची धाकधूक वाढली

दौंड : सहकारनामा

दौंड तालुक्या मध्ये ४९ ग्रामपंचायतींसाठी १५ जानेवारीला मतदान प्रक्रिया पार पडली. हि प्रक्रिया पार पाडताना उमेदवार आणि कार्यकर्त्यांची पुरती दमछाक झाली होती. त्यामुळे परवा झालेल्या मतदानानंतर दोन दिवस आराम मिळाल्याने या निवडणुकीला उभे असणाऱ्या उमेदवारांसह कार्यकर्त्यांनाही ेडासा विरंगुळा मिळाला होता. मात्र उद्या दि.१८ जानेवारी रोजी या ४९ ग्रामपंचतींचा निवडणुक निकाल असल्याने आता उमेदवारांसह कार्यकर्त्यांचीही धाकधूक वाढली आहे.

४९ ग्रामपंचायतीच्या निवडणुकी मुळे बोरीऐंदी पासून ते स्वामीचिंचोली पर्यंत सर्वत्रच राजकीय वातावरण ढवळून निघाले होते. तालुका पातळीवरील मोठ्या निवडणुका मध्ये एक दुसऱ्याच्या विरोधात शड्डू ठोकणाऱ्यांनी गावपातळीवरील निवडणुकीत मात्र एकत्र येऊन निवडणुका लढविल्याने कोण, कोणत्या गटाचा आणि पार्टीचा आहे हे सांगणेही यावेळी कठीण होऊन बसले होते. सोशल मीडियावर वर्षभर नेत्यांचे गुणगान गाणारे विश्वासू कार्यकर्तेकेवळ ग्रामपंचायतीला तिकीट मिळाले नाही म्हणून एका रात्रीत नेता बदलून दुसऱ्या गटात डेरेदाखल झाल्याचेही या निवडणुकीत प्रकर्षाने जाणवले आहे. तर अनेक कार्यकर्त्यांनी गाव पातळीवरील उमेदवारांसोबत असल्याचे भासवत आतून मात्र विरोधात काम केल्याने अनेक उमेदवारांचे धाबे दणाणले आहेत. विविध पैलूंनी तालुक्यातील हि ग्रामपंचायत निवडणूक अनेकांना धडे देऊन नवीन काहीतरी शिकवून गेली आहे तर अनेक मातब्बरांची प्रतिष्ठा या निवडणुकीत पणाला लागली असल्याने उद्या येणाऱ्या निकालाकडे आता सर्वांचेच लक्ष लागून राहिले आहे.











लोकप्रिय वृत्तपत्र सहकारनामा’ डेली न्यूज पोर्टल आणि साप्ताहिकाच्या प्रथम वर्धापनदिन निमित्त



मा.शरदचंद्रजी पवार साहेब
(राष्ट्रीय अध्यक्ष,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी )

हार्दिक शुभेच्छा...

मा.रमेशअप्पा थोरात
(अध्यक्ष,पुणे जि.मध्य.सह.बँक)



श्री. किसन शिवाजी जगदाळे
(व्हा.चेअरमन)



श्री. पोपटराव उर्फ आत्माराम साहेबराव ताकवणे (चेअरमन)

## श्री. रेणुकादेवी सह. दूध उत्पादक संस्था मर्या.

पारगाव (सालू मालू ) ता. दौंड जि. पुणे

शुभेच्छूक –

श्री. पोपटराव उर्फ आत्माराम साहेबराव ताकवणे (चेअरमन)
श्री. किसन शिवाजी जगदाळे (व्हा.चेअरमन)
श्री. सुरेश बापूराव ताकवणे (संचालक)
श्री. अनिल रामचंद्र रणदिवे (संचालक)
श्री. रामदास बाबुराव बोत्रे (संचालक)
श्री. राजेंद्र हरिभाऊ पोमण (संचालक)
श्री. बाळासाहेब चांगदेव ताकवणे (संचालक)
श्री. तुषार नरसिंग ताकवले (संचालक)
श्री. साहेबराव बाबुराव आढागळे (अनु.जाती जमाती)
श्रीमती. शोभा विलास ताकवणे (महिला प्रतिनिधी)
श्रीमती. सुरेखा बाळासो भोगावडे (महिला प्रतिनिधी)
सौ.सविता अंकुश डोंबाळे (भ.वि.जाती)
श्री. एकनाथ शंकर शेळके (सचिव)

सेवक वर्ग –
श्री. शरद शहाजी ताकवणे श्री. अमोल सुरेश ताकवणे
श्री. सागर नारायण शितोळे.






लोकप्रिय वृत्तपत्र सहकारनामा’
डेली न्यूज पोर्टल आणि साप्ताहिकाच्या
प्रथम वर्धापनदिन निमित्त

**हार्दिक शुभेच्छा !**



शुभेच्छूक

भानुदास शिंदे

## रयत क्रांती संघटना

**भानुदास शिंदे (प्रदेश प्रवक्ते, रयत क्रांती संघटना)**

# संपादकिय

## आता कार्यकर्ताही हुशार झाला..

दिवस रात्र आपल्या नेत्यांसाठी झटून काम करणारा कार्यकर्ता आता हुशार झाला आहे. कारण कार्यकर्त्यांना गृहीत धरणाऱ्या गावातील नेत्यांना आता हे कार्यकर्तेही धक्क्यावर धक्के देण्यात तरबेज झाले आहेत. पहिले असून गाव पुढारी आपली भूमिका बदलून पाहिजे तो पर्याय निवडायचे आणि कार्यकर्ते फुकाटपणे मन मारून निमूटपणे त्यांचे काम करायचे असा इतिहास होता पण आता जसे गाव नेते हायटेक झाले आहेत तसेच कार्यकर्तेही हायटेक होऊन दोन हात पुढे निघाले असल्याचे पाहायला मिळत आहे.

कारण आत्तापर्यंत गाव पुढारी एखादा कार्यकर्ता पुढे जाऊ लागला की त्याला पर्याय शोधून त्यास चेक देण्याचे काम करत असायचा किंवा त्याला कार्यकर्ता म्हणूनच दाबून ठेवायचा आता मात्र कार्यकर्ता त्यांच्या दोन हात पुढे जाऊन या गाव पुढाऱ्यांना शह देण्यासाठी त्यांचाच विरोधक असणारा दुसरा गाव नेता पर्याय म्हणून शोधून मोकळे होत आहेत आणि जशास तसे अशा पद्धतीने उत्तर देत आहेत.

या सर्व प्रकारामुळे गाव नेत्यांची पाचावर धारण बसत असून त्यांच्या कुरखोड्यांना आता आळा बसला नाही तर त्यांची राजकीय कारकीर्द धोक्यात येऊ लागली आहे.

त्यामुळे तुम्ही आम्हाला पर्याय शोधत असाल तर तुमचे पर्याय आमच्यापुढे खुले असल्याचे अनेक ठिकाणी कार्यकर्त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे.

तसे कार्यकर्त्यांना वळविण्याचे प्रयत्न आता कालवश झाल्याचे पाहायला मिळत असल्याने आता कार्यकर्ताही हुशार झालाय, त्याला नीट सांभाळा बाबांनो अशी म्हणायची वेळ या गाव नेत्यांवर आली आहे.

अनेक वर्षे इमान इतबारे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची दशा काय होते हे अनेक कार्यकर्ते आपल्या अनुभवातून कन करत असतात. हेच अनुभव डोळ्यासमोर ठेऊन आजचा कार्यकर्ता हायटेक झाला आहे. सोशल मिडीयावर सक्रिय झालेला कार्यकर्ता आपल्या नेत्याच्या स्टेटसवरही लक्ष ठेऊन सावध भूमिकेत राहु लागला आहे. नेत्यांचा कल थोडा जरी इकडे तिकडे दिसला की कार्यकर्त्याने त्याच्या दोन हात पुढे जाऊन त्याच तत्परतेने पक्ष, गट बद्दललाच म्हणून समजा अशी सध्याची कार्यकर्त्यांची कार्य पद्धती झाली आहे. त्यामुळे ना विरोधकांचा रोष, ना कुणाची पारंपरिक दुश्मनी, ना कुणाची हुजरेगिरी असा हा आत्ताच जागरूक कार्यकर्ता बनला आहे. त्यामुळे गाव नेतेही या कार्यकर्त्यांना मान, मरातबाने वागवत असून आपण ेडिजरी जागेवरून हललो की याने जागा सोडलीच म्हणून समजा हे नेत्यांनी पुरते ओळखून घेतलेले आहे. आणि त्यामुळे आता आजचा कार्यकर्ता हुशार होऊन आपले अस्तित्व टिकवून आहे यात शंका नाही.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अब्बास इसाक शेख यांनी प्रिती प्रिंटिंग प्रेस हरिनिर्मल कॉम्प्लेक्स, हरिकृपानगर, मार्केट यार्ड समोर, इंदापूर रोड, बारामती, ता.बारामती, जि.पुणे (महाराष्ट्र) या ठिकाणी छापून केडगाव मस्जीद जवळ, केडगाव, ता.दौंड, जि.पुणे (महाराष्ट्र)-४१२२०३ येथून प्रसिध्द केले.

या अंकात प्रसिध्द झालेल्या लेखातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# दौंड पोलीस स्टेशन समोरून भर दिवसा दुचाकी चोरीला!

## दुचाकीच्या डिकीमधील ८७ हजार रुपये लंपास सिसीटीव्हीमध्ये चोरटे कैद.. चोरट्यांना पकडण्याचे दौंड पोलिसांसमोर आव्हान

दौंड:सहकारनामा (अख्तर काझी)दौंड पोलीस स्टेशन समोरील येवले चहा हॉटेल समोर लावलेली दुचाकी चार जणांच्या टोळक्याने भरदिवसा चोरून नेल्याची घटना घडली आहे. चोरीला गेलेल्या दुचाकीच्या डिकीमध्ये ८७ हजाराची रोकड असल्याने घटना आणखीनच गंभीर झाली आहे.

पोलीस स्टेशन च्या अगदी समोरून चोरट्यांनी दुचाकी चोरून नेल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. दौंड पोलिसांना जणू आव्हान देण्या सारख्याच घटना शहरात दिवसागणिक घडु लागत असल्याने पोलिसांनी सुद्धा आता अशा घटना गांभीर्याने घेण्याची गरज झाली आहे अशा प्रतिक्रिया सुद्धा व्यापारी वर्गातून उमटत आहेत.

धनंजय नारायण साळुंखे(वय ४२,रा. मळद, दौंड) यांनी याप्रकरणी फिर्याद नोंदविली असून दौंड पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. घटनेची पोलिसांनी दिलेली माहिती अशी, फिर्यादी यांनी आपल्या मालकीची दुचाकी(टिवटि जुपिटर,चक ४२-ध २८८२) आपले भाचे अक्षय वाघमारे(रा. कुंभार गल्ली, दौंड) यांना वापरावयास दिली होती.दि.१३जाने. रोजी सकाळी १० च्या सुमारास फिर्यादीचा मावस भाऊ हा अक्षय याच्या घरून ही दुचाकी घेऊन येवले चहा हॉटेल समोरील आपल्या केश कर्तनालयाच्या दुकानात आला, त्यावेळी त्याने दुचाकी हॉटेल समोर हँडल लॉक करून उभी केली दरम्यान दुकानातील साहित्याच्या खरेदीसाठी असलेले आपल्याकडील ८७ हजार रुपये त्याने दुचाकीच्या डिकीमध्ये ठेवले व दुकानात आला. दुकानातील कामकाज आवरून दुपारी १ वाजण्याच्या दरम्यान तो गाडी लावलेल्या ठिकाणी आला असता त्या ठिकाणी त्याला दुचाकी आढळून आली नाही. फिर्यादी व नातलगांनी परिसरात व शहरात सदर दुचाकीचा शोध घेतला मात्र दुचाकी मिळाली नाही त्यामुळे दुचाकी चोरीला गेली आहे हे लक्षात येताच फिर्यादी व त्याच्या मित्रांनी दौंड पोलिसांना दुचाकी चोरीच्या घटनेची माहिती दिली, त्यावेळी पोलीस स्टेशनला हजर असलेले पोलीस कर्मचारी रोटे यांनी लागलीच पोलीस स्टेशन परिसरात लावलेल्या उउढतचे फुटेज तपासले असता चार जणांच्या टोळक्याने दुचाकी चोरून नेल्याचे दिसले आहे. ज्या ठिकाणाहून दुचाकी चोरीला गेली तेथील हॉटेल कल्पलता मधील उउढत फुटेज ूध्ये सुद्धा हे चोरटे कैद झाले आहेत. सिसीटीव्ही फुटेज च्या आधारे पोलिसांना जर हे चोरटे पकडण्या मध्ये यश आले तर शहरातील अनेक दुचाकी चोरी घटनांचा उलगडा होवू शकेल असे बोलले जात आहे.

# केडगावच्या तलाठ्यांकडून नागरिक, जेष्ठ महिलांना अरेरावीची भाषा, केडगाव ग्रामपंचायतीची कारवाई करण्याची मागणी

दौंड : सहकारनामा
केडगाव ता. दौंड येथील गाव कामगार तलाठ्यांकडून नागरिकांची किरकोळ कागदपत्रांसाठी अडवणूक करणे, त्यांना अरेरावीची भाषा वापरणे असले प्रकार घडत असून

जर सर्वसामान्य जनतेसाठी नेमलेले अधिकारी, कर्मचारी प्रतिष्ठित लोकांसोबत अशा पद्धतीने वागत असतील तर सर्वसामान्य नागरिकांना ते कोणत्या पद्धतीने वागणूक देत असतील असा प्रश्न आता उपस्ति केला जात आहे. या तलाठ्यांकडून सरपंच अजित शेलार, किरण देशमुख, पाराजी हंडाळ, ग्रा.प. सदस्य अशोक शेंडगे यांनाही वेळोवेळी अडवणूक करणे, अरेरावीची भाषा वापरणे, काय करायचे ते करून घ्या अशा उद्धट भाषेचा अनुभव आला असल्याचे त्यांनी सांगितले आहे. तर या तालाठ्यांमुळे केडगावमधील शेतकरी, सर्वसामान्य नागरिक आणि जेष्ठ महिला त्रस्त झाल्या असून या गाव कामगार तलाठ्यांवर वरिष्ठांनी त्वरित कारवाई करण्याची मागणी केडगाव ग्रामपंचायतीकडून पत्राद्वारे करण्यात आली आहे.

# ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्यात मोठा शस्त्र साठा जप्त, स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई

पुणे : सहकारनामा
पुणे जिल्ह्यामध्ये दिनाक १५/१/२०२० रोजी ग्रामपंचायत निवडणूका असल्याने कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पुणे ग्रामिण पोलीस अधीक्षक अभिनव देशमुख यांनी सूचना दिल्या आहेत. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेच्या पकांनी हद्दीमध्ये पेट्रोलिंग सुरू केले आहे.

दिनांक१३/१/२०२० रोजी सनिक गुन्हे शाखेचे पक खेड विभागात पेट्रोलिंग करत असताना त्यांना २ इसम खेड बस स्टॅन्ड जवळ अवैद्यरित्या पिस्टल विक्री साठी घेऊन येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यांनी लागलीच पोलीस पकासह त्या ठिकाणी जाऊन या दोन इसमांना त्यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिली त्यामुळे त्यांचा संशय आल्याने त्यांची अंग झडती घेतली असता दोघांच्या कमरेला प्रत्येकी २ असे एकूण देशी बनावटीचे ४ पिस्टल व त्यामध्ये प्रत्येकी २ असे ८ राउंड असा एकूण १,७४,८०० असा मुद्देमाल मिळून आला आहे.

या आरोपींची नावे प्रवीण उर्फ डॉलर सीताराम ओव्हाळ (वय २८ रा. वाळद, ता. खेड, जि.पुणे) व निलेश उर्फ दादा राजेंद्र वांझरे (वय २४,रा. वांझरवाडी, ता. दौंड, जि. पुणे) अशी असून सदर आरोपींची वैदकीय तपासणी करून त्यांना पुढील कारवाई साठी खेड पोलीस स्टेशन च्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अभिनव देशमुख, अप्पर पोलीस अधीक्षक विवेक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पद्माकर घनवट, पोसई श्री, अमोल गोरे, पोहवा जनार्दन शेळके, पो.ना. राजू मोमीन, पो.शि. अमोल शेडगे, पोशी मंगेश भगत, पो.शि.बाळासाहेब खडके, पो.शि.अक्षय नवले, पो.शि. अक्षय जावळे, सहा.फौ. दत्तात्रय जगताप, सहा.फौ.शब्बीर पठाण, पोहवा विद्याधर निचीत, पो.हवा. मुकुंद आयाचित, प्रमोद नवले, पो.ना. सागर चंद्रशेखर, पोशी प्रसन्न घाडगे यांनी केली आहे.

# एखाद्या व्यक्तीचा जीव वाचवण्याचे पुण्यकार्य करण्यासाठी रक्तदान करा - राज्यमंत्री अब्दुल सत्तार




पुणे : सहकारनामा
रक्तदान करणे हे एक मोठे काम असून यामुळे एखादया दुसऱ्या व्यक्तीचा जीव वाचू शकतो. रक्तदान करण्यासाठी सर्वांनी पुढे आले पाहिजे, असे आवाहन महसूल, ग्रामविकास, बंदरे, खार जमिनी विकास, विशेष सहाय्य राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांनी आज पुण्यात केले.

पुण्यातील कोंढवा येथे महा रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीराचे उद्घाटन श्री.सत्तार यांच्या हस्ते झाले त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार चेतन तुपे,माजी आमदार महादेव बाबर, कारी मोहम्मद इदरीस,माजी सयी समिती सदस्य रसिद शेख, अलाहद इब्राहिम भाई, उस्मान तांबोळी, नदीम मुजावर, नगरसेवक गफूर पठाण, ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. मुरलीधर तांबे आदी मान्यवर उपस्थित होते. राज्यमंत्री अब्दुल सत्तार म्हणाले, कोरोनाच्या महामारीमुळे राज्यात रक्ताचा तुटवडा आल्याने मा. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी राज्यातील सर्व जनतेला रक्तदान करण्याचे आवाहन केलेले असून रक्तदान करणे हे एक मोठे काम आहे. सर्वांनी रक्तदान केले पाहिजे. अशा रुग्णालयांवरही आपण सर्वांनी विश्वास ठेवणे गरजेचे आहे. राज्यातील गोर गरिबांना मदत करणे महत्वाचे आहे. या शिबिराच्या कार्यक्रमास सहभागी झालेल्या सर्वांना व रक्तदात्यांना मी मनापासून शुभेच्छा देतो असेही ते म्हणाले. यावेळी लॉकडाऊन कालावधीत ज्यांनी चांगले काम केले त्यांचा सन्मानही राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते करण्यात आला.

आमदार चेतन तुपे म्हणाले, कोरोनामुळे राज्यात रक्ताचा तुटवडा आला आहे. मा.मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, राज्यमंत्री यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देवून या ठिकाणी रक्तदान शिबीराच्या भव्य कार्यक्र'ाचे आयोजन केले गेले. हे फार महत्त्वाचे असून यामुळे एखाद्या व्यक्तीला रक्त उपलब्ध होऊन त्याचे प्राण वाचू शकतो. हे शिबीर यशस्वी होण्यासाठी ज्यांनी सहभाग घेताला अशा सर्वांना मी शुभेच्छा देतो. यावेळी माजी आमदार महादेव बाबर, अलाहद इमब्राहिम भाई यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कारी मोहम्मद इदरीस यांनी केले तर सुत्रसंचालन सोयब अन्सारी यांनी केले. यावेळी रक्तदाते, ससून सर्वोपचार रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी, कमचारी उपस्थित होते.

# पक्ष धनंजय मुंडेंबद्दल लवकरच निर्णय घेईल, शरद पवारांच्या विधानामुळे धनंजय मुंडे अडचणीत!

मबई : सहकारनामा
राज्याचे मंत्री आणि राष्ट्रवादीची तोफ समजले जाणारे धनंजय मुंडे यांच्या अडचणी वाढत असल्याचे दिसत आहे. धनंजय मुंडे यांच्यावरील बलात्काराच्या आरोपावरून राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी मोठे विधान केले असून राष्ट्वादी काँग्रेसला एक पक्ष म्हणून या प्रकरणाचा गांभीर्याने विचार करावा लागेल असे वक्तव्य पवारांनी केल्याने राजकीय गोटात खळबळ माजली आहे.

पवार यांनी अधिक माहिती देताना याप्रकरणात न्यायालय पोलीस प्रशासन काय कारवाई करायची ती करतील. पण राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष त्यांच्याबाबत लवकरच निर्णय घेईल, असे वक्तव्य शरद पवार यांनी केले. याबाबत गुरुवारी ते मुंबईमध्ये प्रेस आणि इलेक्ट्रॉनिक मीडियाशी बोलत होते.

त्यांनी मीडियाशी बोलताना मुंडे हे मला बुधवारी भेटले होते, त्यांच्यावर करण्यात आलेल्या आरोपांबाबत मला त्यांनी सविस्तर माहिती दिली.

आता धनंजय मुंडे यांच्यावरील आरोपांबाबत बोलायेच झाल्यास ते गंभीर स्वरुपाचे आहेत. एक पक्ष म्हणून या सगळ्याचा आम्हाला गांभीर्याने विचार करावा लागेल.



पक्षातील प्रमुख सहकाऱ्यांशी माझं अद्याप बोलणं झालेलं नाही. मात्र, मी त्यांना विश्वासात घेऊन धनंजय मुंडे यांनी मला दिलेली माहिती त्यांच्यापुढे मांडणार आहे. त्यानंतर आम्ही धनंजय मुंडे यांच्याबाबत निर्णय घेऊ असे शरद पवार यांनी स्पष्ट केले आहे.

## सर्वसामान्यांसाठी अहोरात्र झगडणाऱ्या बाबांना पद्मश्री मिळेल का!

सहकारनामा विशेष :
बाबा उर्फ अशोकबाबा जाधव यांना लोकनाट्य जगतात कुणी ओळखत नाही असा व्यक्ती शोधून सापडणार नाही.

बाबांचे कार्य लक्षात घेता आता शासनाने त्यांना पद्मश्री पुरस्कार देऊन गौरविल्यास त्यांच्या आत्तापर्यंतच्या समाजकार्याच्या आणि त्यांच्या समाजाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोचला जाईल आणि समाजातील तळागाळातील कलावंतांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी त्यांना अजूनही पाठबळ मिळेल अशी मागणी आता कालावंतांकडून जोर धरत आहे.

महाराष्ट्रातील तमाशा कलावंतांना तसेच कोल्हाटी समाजातील भटक्या विमुक्त

कलावंतांना स्थैर्य देण्याचे त्यांचे वेगवेगळे प्रश्न सोडवण्याचे व त्यांना समाजात प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी सुमारे तीस वर्षापासून समाज कार्य अशोक बाबा जाधव हे करीत आले आहेत.

स्वतः कोल्हाटी समाजाचे असल्याने आपल्या समाज बांधवांचे दुःख त्यांना जवळून पाहिले आहे. त्यामुळे तब्बल तीस वर्षापासून ते या लोकांसाठी त्यांचे हे समाजसेवेचे कार्य न कता अविरतपणे करत आहेत. गावागावांता पोटापाण्याकरीता कला प्रदर्शन करणाऱ्या आपल्या कोल्हाटी समाजाला स्थैर्य यायला हवे याची जाणीव त्यांना नेहमीच सतावत राहीली. त्यासाठी त्यांनी इ.स.१९८१ साली न्यु अंबिका सांस्कृतिक (लोकनाट्य) कला केंद्राची चौफुला (वाखारी/ केडगाव),
ता.दौंड, जि. पुणे येथे स्थापना केली.

या कलाकेंद्राच्या माध्यमातुन पोटासाठी भिक मागणाऱ्या आणि रस्तोरस्ती गल्ली बोळात गाण्याची तान मारत हिंडत राहीलेल्या कोल्हाटी समाज बांधवांना राहण्याची व आपली कला सादर करण्याचं एक हक्काचं व्यासपीठ उपलब्ध झालं.

आज न्यु अंबिका सांस्कृतिक (लोकनाट्य) कला केंद्रामध्ये सुमारे पाचशे कलावंत आपला उदरनिर्वाह करीत आहेत. या कलाकेंद्रामुळे अनेक कोल्हाटी समाजबांधवांचा पोटा पाण्याचा प्रश्न सुटला आहे. कलावंतांना चांगल्या आरोग्य सुविधा मिळाल्या पाहीजेत. तसेच कलावंतांच्या मुलाबाळांना चांगल्या शैक्षणिक सुविधा मिळाल्या पाहीजेत यावर अशोकबाबा जाधव यांनी विशेष भर दिला आणि त्यांच्या प्रयत्नांना यशही येत आहे.

केंद्र व राज्य सरकारकडुन कलावंतांचे प्रश्न सोडवण्याकरीता त्यांनी पुढाकार घेतला. तसेच कोल्हाटीच नव्हे तर इतर समाजातील वृद्ध कलावंतांना शासनाकडुन अनुदान मिळावे यासाठी ते नेहमी कार्यरत राहिले आहेत.

दरवर्षी संत तुकोबारायांच्या पालखी सोहळ्यामध्ये सुमारे ८ ते १० हजार वारकरी सांप्रदायातील विठठल भक्तांना अन्नदान केले जाते. ही सेवा गेल्या २५ वर्षापासून अविरतपणे चालू आहे. समाजातील प्रत्येक घटकांना मदत करण्यास बाबा नेहमीच तत्पर असतात. अनेक नैसर्गिक आपत्तीमध्ये त्यांनी लोकांना सढळ हाताने मदत केली आहे. दुष्काळ, कोल्हापुर सांगली महापुर इ. आपत्तीमध्ये त्यांनी आपत्तीग्रस्तांना जिवनावश्यक वस्तुंचे वाटप केले. कारगिल युद्धाप्रसंगी सैनिक व सैनिकांच्या कुटुंबियांना एक्कावन्न हजारांची (५१,०००)मदत केली होती. तसेच किल्लारी भुकंपावेळी अनेक भुकंपग्रस्तांना अन्नधान्याची व रोख स्वरुपात मदत करून त्यांनी आदर्श निर्माण केला आहे.

विविध शासनाच्या कार्यक्रमांचे आयोजन करून तमाशा कलावंतांना शासन दरबारी प्रतिष्ठा मिळवुन देण्यासाठी ते नेहमीच अग्रशील राहिले आहेत. समजाचा तमाशा व तमाशा कलावंतांकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलण्यासाठी ते प्रयत्न करीत आहेत. त्यांची ही समाजसेवा पाहून अनेकांना त्यांच्यापासून प्रेरणा मिळत आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन शासनाकडून त्यांना अनेक पुरस्कार व मानचिन्हे देवुन गौरवण्यात आलेले आहे. त्यांचे कार्य लक्षात घेता आता शासनाने त्यांना पद्मश्री पुरस्कार देऊन गौरविल्यास त्यांच्या आत्तापर्यंतच्या समाजकार्याच्या आणि त्यांच्या समाजाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोचला जाईल आणि समाजातील तळागाळातील कलावंतांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी त्यांना अजूनही पाठबळ मिळेल यात शंका नाही.

# वरवंडमध्ये शेळयांच्या कळपावर बिबट्याचा हल्ला ५ बकऱ्या ठार तर २ जखमी

दौंड : सहकारनामा

दौंड तालुक्यामध्ये सध्या बिबट्याने थैमान घातले आहे. दररोज कुठे न कुठे बिबट्याच्या हल्ल्यात प्राणी मारले जाऊ लागले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊ लागले आहे.

आज दि.१२ जानेवारी रोजी पहाटे ३ वाजण्याच्या सु'रास वरवंड यील टेंगले वस्तीवर बिबट्याने संभाजी नामदेव टेंगले यांच्या बकऱ्यांच्या कळपावर अचानक हल्ला करून ५ बकऱ्या ठार केले तर २ बकऱ्या या हल्ल्यात जखमी झाल्या आहेत.



बिबट्याच्या या हल्ल्यामुळे नामदेव टेंगले या शेतकऱ्याचे जवळपास एक लाख रुपयांपेक्षा जास्त असे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे या शेतकऱ्याला त्वरित शासनाकडून भरपाई मिळावी अशी विनंती शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

या परिसरात बिबट्याचा वावर हा मोठ्या प्रमाणावर वाढला असून या बिबट्याला त्वरित न पकडल्यास मोठी अघटित घटना घडण्याची भीती व्यक्त होत आहे. सध्या शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव नाही, कोरोना संकट अजूनही डोक्यावर आहे त्यामुळे अगोदरच मोठ्या आर्थिक संकटात सापडलेला शेतकरी आता या अश्या मोठ्या नुकसानिमुळे पुरता मेटाकुटीस आला आहे. वन विभागाकडून या भागात पिंजरा लावून त्वरित या बिबट्याला पकडण्याची मागणी जोर धरत आहे.

# अप्पा लोंढे खून खटल्याची सुनावणी कारागृहातच होणार!

पुणे : सहकारनामा

उरुळी कांचन आणि संपूर्ण पुणे जिल्ह्यात एकेकाळी मोठा दबदबा निर्माण करणाऱ्या अप्पा लोंढे याच्या खून प्रकरणाची सुनावणी आता कारागृहातच होणार असल्याची माहिती समोर येत आहे.

कारण या खून खटल्यातील आरोपींची संख्या हि मोठी असून यामुळे सुरक्षेच्या कारणावरून तसेच कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे हा निर्णय घेतला जाणार असल्याचे समजते. अप्पा लोंढे याच्या खून प्रकरणातील आरोपींवर सत्र न्यायाधीशांसमोर कारागृहातच खटला चालण्याचे हे दुर्मिळ प्रकरण आहे.

या प्रकरणाची येत्या २० जानेवारीपासून सत्र व विशेष मोका न्यायाधीशांसमोर सुनावणी होणार आहे. अप्पा लोंढे खून प्रकरणात संतोष भीमराव शिंदे, नीलेश खंडू सोलनकर, राजेंद्र विजय गायकवाड, आकाश सुनील 'हाडीक, नितीन महादेव मोगल, विष्णू यशवंत जाधव, नागेश लक्ष्मण झाडकर, मनी कुमार चंद्रा ऊर्फ अण्णा, विकास प्रभाकर यादव, गोरख बबन कानकाटे, अण्णा ऊर्फ बबड्या किसन गवारी, प्रमोद ऊर्फ बापू काळुराम कांचन, सोमनाथ काळुराम कांचन, रवींद्र शंकर गायकवाड, प्रवीण मारुती कुंजीर या आरोपींच्या विरोधात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले होते. २८ मे २०१५ रोजी पहाटे अप्पा लोंढे हा वॉकिंगसाठी बाहेर पडल्यानंतर त्याचा खून करण्यात आला होता. अप्पाचा खून हा वाळू व्यवसाय आणि त्याच्यापासून वाटत असलेल्या व्यावसायिक भीतीतून करण्यात आला असल्याचे पोलीस तपासात पुढे आले होते. अप्पा लोंढे खून प्रकरणात ॲड. विकास शहा हे विशेष सरकारी वकील कामकाज पाहत आहेत.

# ग्रामपंचायत निवडणुकीला हिंसक वळण! प्रचार करणारी कार्यकर्त्याची जीप पेटवली

पुणे : सहकारनामा

सध्या ग्रामपंचायत निवडणुकीचे वारे वाहत आहे. कुणी कोणती कसर कुठे अन कशी काढेल याचा काही नेम नाही.

असाच काहीसा प्रकार हवेली तालुक्यात घडला असून ये ग्रामपंचायत निवडणुकीत करण्यात येत असलेल्या प्रचाराचा राग मनात धरून कोरेगाव मूळ येथील प्रचारात अग्रेसर असणाऱ्या एका कार्यकर्त्याची महिंद्रा कंपनीची र मॉडेल जीप ज्वलनशील पदार् ओतून पेटवून देण्याचा भयंकर प्रकार घडला आहे. हा प्रकार गुरुवारी रात्री घडला असून याप्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हि गाडी मंगेश सुरेश शितोळे ( वय- ३५, रा.इनामदार वस्ती, कोरेगाव मुळ, ता.हवेली ) याची असून त्यांनी या प्रकरणी लोणीकाळभोर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या घटनेत त्यांची महिंद्रा र जीप ही आगीत पूर्णपणे जळून मोठे नुकसान झाले आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार हवेली तालुक्यातील कोरेगावमूळ येथे दि.७ जानेवारी रोजी रात्री अज्ञात इसमांनी निवडणुकीत होत असलेल्या प्रचाराचा राग मानत धरून अंधारात गाडीवर पेट्रोल टाकून ती पेटवून दिली आहे. यात ही जीप पूर्णपणे जळली असून या जीपचे अंदाजे ४ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या घटनेचा अधिक तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक पवन चौधरी हे करीत आहेत.

# आता घर खरेदी करताना स्टॅम्प ड्युटी बिल्डरला भरावी लागणार, राज्य सरकारने घेतले आज अनेक महत्वाचे निर्णय

मुंबई : सहकारनामा

घर खरेदी करण्याचे प्रत्येकजण स्वप्न पाहत असतो मात्र अनेकांना घर घेताना द्यावी लागणारी स्टॅम्प ड्युटी ही डोंगरा एवढी वाटत असते.

सर्वसामान्यांची हीच अडचण लक्षात घेऊन राज्य सरकारने याबाबत मोठा निर्णय घेतला असून आता घर खरेदी करताना ग्राहकांना स्टॅम्प ड्युटी भरावी लागणार नाही तर ही स्टॅम्प ड्युटी आता बिल्डरांना भरावी लागणार असल्याचा महत्वपूर्ण निर्णय आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. याच बरोबर बांधकामांवर प्रीमियम सवलती देण्याचा निर्णयही देखील आज घेण्यात आला असल्याची माहिती राज्याचे गृहमंत्री अनिल देशमुख यांनी दिली आहे. आज राज्य सरकारच्या मंत्रिमडळा मध्ये काही महत्वाचे निर्णय घेण्यात आले असून यामध्ये बांधकामांवर प्रीमियम सवलत, बिल्डरांनी स्टॅम्प ड्युटी भरणे, राज्यातील ग्रामीण भागातील रस्ते दर्जेदार करण, केंद्र सरकारच्या ग्रामीण रस्ते विकास मंत्रालयासोबत सामंजस्य करारात सहभागी होणे, औरंगाबाद येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व कर्करोग रुग्णालय येथे नव्याने १६५ खाटा आणि ३६० पदांच्या निर्मिती करण्यास मान्यता देणे, शेतकऱ्यांना कृषी पंप वीज पंपासाठी सौर ऊर्जा उपलब्ध करणे, पुणे जिल्ह्यातील वडगाव मावळ येथे जिल्हा व अतिरीक्त सत्र न्यायालय तसेच दिवाणी न्यायाधीश (वरीष्ठ स्तर) ही दोन न्यायालये उभारणे, आणि महाराष्ट्रातील ३१ डिसेंबर २०२० पर्यंतच्या गुंठेवारी योजना नियमित करणे तसेच गरीब व सर्वसामान्य लोकांच्या निवाऱ्याची गरज पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियमात सुधारणा करण्यास मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# दौंड आणि बारामती' तालुक्यातील गंभीर गुन्हे उघडकीस आणणाऱ्या एलसीबी'च्या ननावरे आणि जाधव यांचा पोलीस अधिक्षकांकडून सन्मान

पुणे : सहकारनामा

पुणे जिल्ह्यात असणाऱ्या दौंड आणि बारा'ती तालुक्यातील महत्त्वाचे गंभीर गुन्हे उघडकीस आणून आरोपींना जेरबंद करणाऱ्या सनिक गुन्हे शाखेचे पोलिस उपनिरीक्षक शिवाजी ननावरे आणि पोलिस कॉन्स्टेबल धिरज जाधव यांना मा पुणे ग्रामिण पोलिस अधिक्षक अभिनव देशमुख साहेब यांच्या हस्ते पुरस्कृत करण्यात आले. हा सन्मान त्यांनी विविध गुन्हे प्रकटीकरण केल्याबद्दल करण्यात आला असून या सन्मानामुळे आम्हाला कामाप्रति अजून मोठे बळ मिळाले असून नवीन चेतना निर्माण झाली असल्याची भावना या दोन्ही पोलिसांनी बोलून दाखवली.

बारामती विभाग व दौंड विभागातील खून, जबरी चोरी, दरोडा अवैद्य गावठी पिस्तूल बाळगणारे इत्यादी दाखल गुन्ह्यांचा तपास करून आरोपींना जेरबंद केले आहे. तसेच कापूरहोळ, सातारा रोड येथे पोलिसाचा वेश करून ज्वेलर्सच्या दुकानावर दरोडा टाकला होता. सदर आरोपींना पकडून जेरबंद केले त्याबद्दल माननीय पोलीस अधीक्षक डॉक्टर अभिनव देशमुख यांनी त्यांना प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित केले आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस उपनिरीक्षक शिवाजी ननावरे आणि पोलिस कॉन्स्टेबल धिरज जाधव हे सनिक गुन्हे शाखा डलल मध्ये कार्यरत असून त्यांची कामगिरी आणि त्यांचे झालेले कौतुक पाहून पोलीस यंत्रणे'ध्ये स'ाधान व्यक्त केले जात आहे. तर त्यांच्या सोबत का' करणाऱ्या त्यांच्या सौदारांकडून त्यांना शुभेच्छा देऊन त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

# किमी अंतरासाठी १५० रुपये टोल

## पाटस टोलनाक्यावर स्थानिकांच्या लुटीमुळे रयत क्रांतीकडून आंदोलनाचा इशारा

हकारनामा

दौंड तालुक्यातील पाटस येथे पुणे सोलापूर हायवेवर असलेल्या पाटस टोल प्लाझा या टोल नाक्यावर सनिक प्रवाशांची मोठ्या प्रमाणावर लूट केली जात असल्याचा आरोप रयत क्रांती संघटनेचे नेते आणि प्रदेश प्रवक्ते भानुदास शिंदे यांनी केला आहे. हि लूट त्वरित न थांबल्यास या टोलनाक्यावर आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.




रयत क्रांती संघटनेचे प्रदेश प्रवक्ते भानुदास शिंदे यांनी माहिती देताना दौंड तालुक्यातील पाटस, गार, गिरीम, कानगाव येथील नागरिकांना कोर्ट, आरटीओ तसेच इतर शासकीय आणि विविध कामांसाठी बारामतीला जावे लागते. या ३ ते ४ गावांतील नागरिकांना बारा'तीला जाताना मध्ये पाटस टोल नाका लागतो. या टोलनाक्यावरून बारामती फाटा अवघा अर्धा किलोमीटर आहे तर जाऊन-येऊन हे अंतर १ किमी भरते. जाऊन येऊन १ किमी भरत असलेल्या अंतरासाठी या टोल प्लाझावर सुमारे १५० रूपये टोल वाहन चालकांना भरावा लागतो. कारण बारामतीला जाणारी साईड लेन ये बंद करण्यात आली असून तुम्हाला बारामतीला जरी जायचे असेल तरी याच टोलवर येऊन टोल भरल्याशिवाय तुम्हाला जात येत नाही असा नियमच येथे अधोरेखित करण्यात आलेला आहे.

५०-६० किमीसाठी आकारला जाणारा टोल हा १ किमीसाठी सुद्धा तितकाच आकारला जातो त्यामुळे ही सर्वसामान्य, स्थानिक नागरिक आणि प्रवाशांची लूट आहे आणि ही लूट आम्ही होऊ देणार नाही, वेळ प्रसंगी येथे तीव्र आंदोलन केले जाईल असा इशारा रयत क्रांती संघटनेचे प्रदेश प्रवक्ता भानुदास शिंदे यांनी दिला आहे.

याबाबत पाटस टोल प्लाझाचे मुख्य अधिकारी सिंग यांना संपर्क केला असता त्यांची प्रतिक्रिया समजू शकली नाही.

# यवत मधील अतिक्रमण ठरला निवडणूक प्रचारात कळीचा मुद्दा, दोन्ही गटांचे परस्पर विरोधी आरोप

दौंड : सहकारनामा

दौंड तालुक्यातील यवत ग्रामपंचायत निवडणुकीत सध्या अतिक्रमण हा कळीचा मुद्दा बनला आहे. हा मुद्दा मोठ्या प्रमाणावर गाजत असून हा मद्दा थेट जाहिरनाम्यात छापून आल्याने यवत मधील सर्वसामान्य नागरिकांमध्ये चांगलीच खळबळ माजली आहे.

यवतमध्ये कुल आणि थोरात हे दोन गट प्रबळ आहेत आणि दोन्ही गटांनी या निवडणुकीत आपली प्रतिष्ठा पणाला लावली आहे.

ही निवडणूक कुलगटाचे सुरेश शेळके, बाळासाहेब लाटकर, नानासाहेब दोरगे, शब्बीरभाई सय्यद यांसह मान्यवरांकडून काळभैरवना पॅनल तयार करून लढवली जात आहे. तर तब्बल १० वर्षेया ग्रामपंचायतीमध्ये सत्तारूढ असणारे थोरात गटाचे नेतृत्व कुंडलिक खुंटवड, रामदास दोरगे, सदाशिव दोरगे हे करत असून त्यांनी यवत विकास आघाडी पॅनल बनवले आहे.

यवत येथील शासकीय जागेतील भूमिहीन अतिक्रमणे व लोकांची घरे नियमित करण्यासाठी यवतच्या व इतर भागातील लोकांची मागणी लक्षात घेता आमदार राहुल कुल यांनी ही घरे नियमित करण्यासाठी सभागृहात मागणी केली होती मात्र यवत येथील ग्रामपंचायतीने ही अतिक्रमणे त्वरित थांबवून काढून टाकण्याचा पत्र व्यवहार पुणे 'हानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला पी.एम.आर.डी.ए ला केला आहे असा आरोप कुल गटाकडून करण्यात येऊन हा पत्रव्यवहाराचा पुरावा थेट त्यांनी जाहीरनाम्यात छापल्याने आता थोरात गटाला याचे उत्तर देताना चांगलीच दमछाक होत आहे.

सध्या कुल आणि थोरात गटाने आपापल्या परीने 'ातब्बर उ'दवार निवडणूक रिंगणात उतरवले आहेत. सध्या दोन्हीबाजूने मजबूत प्रचार सुरू असून आरोप प्रत्यारोप सुरू आहेत, यातच आता कुल गटाने सर्वसामान्य भूमिहीन लोकांची घरे वाचविण्याची मोहीम उघडल्याने राजकीय वातावरण पुरते ढवळून निघाले आहे. आमची सत्ता आली तर एकाही गरीबावर, भूमिहिनावर आम्ही अन्याय होऊ देणार नसल्याचे कुल गट ठामपणे सांगत आहे. तर यवतच्या सर्वांगीण विकासासाठी पुन्हा एकदा आम्हाला संधी द्या असे थोरात गट म्हणत आहे.

अतिक्रमण काढण्याच्या मुद्द्याबाबत मा.सरपंच यांनी खुलासा करताना अतिक्रमण काढण्याच्या पत्राबाबत विरोधक आपल्या सोई प्रमाणे अर्थ लावून त्याचा निवडणूक प्रचाराचा मद्दा बनवत आहेत. ही खरी वस्तुस्थिती नसून आम्ही सर्व लोकांना घरे मिळावी, त्यासाठी जागा उपलब्ध राहावी आणि त्या जागेमध्ये अधिकचे अतिक्रमण न होता पी.एम.आर.डी.ए. चे काम होऊन सर्वांना समान घरे मिळावी यासाठी तो पत्र व्यवहार केला असल्याचे त्यांनी खुलासा केला आहे.

निर्भिड बातम्यांचे व्यासपीठ
साप्ताहिक सहकारनामा
आजच अंकाची मागणी करा
मोबा.९०९६७७७७५०

# बोरीपार्धीमधून अभिषेक आनंद थोरात बिनविरोध, एकूण ३ जागा बिनविरोध

दौंड : सहकारनामा

दौंड तालुक्यातील बोरीपार्धी या गावच्या ३ जागा बिनविरोध झाल्या असून आता उर्वरित १४ जागांवर निवडणूक होणार आहे.

अभिषेक थोरात हे वार्ड क्रमांक ५ मधून बिनविरोध झाले असून या ठिकाणी त्यांच्यासोबत ओबीसी महिला कॅटेगिरीतून रोहिणी दत्तात्रय नेवसे या बिनविरोध झाल्या आहेत. ५ क्रमांकाच्या या वार्डमध्ये संपत मगर, गणेश महाडिक आणि गणेश ताडगे यांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले त्यामुळे ही जागा बिनविरोध झाल्याची घोषणा करण्यात आली. वार्ड क्रमांक ६ मध्ये भोसले या महिला या अगोदरच बिनविरोध झाल्या आहेत. अभिषेक थोरात हे भीमापाटस कारखान्याचे माजी व्हाईस चेअरमन आनंद थोरत यांचे पुत्र असून माजी स्व.आमदार काकासाहेब ेारात यांचे नातू आहेत.

# रावणगाव जवळ कॅनालमध्ये मृतदेह सापडला

दौंड : सहकारनामा

दौंड तालुक्यातील रावणगांव येथील कॅनालमध्ये १४ जानेवारी रोजी एक पुरुष जातीचा मृतदेह आढळून आला आहे. या मृतदेहाचे वय ४० ते ४५ च्या दरम्यान असल्याची 'ाहिती मिळत आहे.

मृतदेहाचा पेहराव अंगावर काळया रंगाचे जॅकेट, पायात बुट, हातात घडयाळ आहे. मृताचे पोस्टमार्टेम रावणगांव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात करण्यात आले अशी माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ.शिदे यांनी दिली. अधिक तपास रावणगांव येथील पोलीस चौकीच्या पोलिस उपनिरीक्षक काटे यांच्या मार्गदर्शना खाली हवालदार बापु बंडगर,गोरख मलगुंडे,हंडाळ, होले,शिंदे करित असून या मृत इस'ाबाबत माहिती मिळाल्यास दौंड पोलिस ठाणे दूरध्वनी ०२११%२६२३३३ या नंबरवर संपर्क साधण्याचे आवाहन रावणगांव पोलिसांनी केले आहे.

# दौंड मधील नियोजित बुद्ध विहाराच्या जागेत बेवारस प्रेतांचा दफन विधी!

## नगरसेवक गौतम साळवे यांची कारवाईची मागणी

दौंड : सहकारनामा (अख्तर काझी)

शासनाच्या वैशिष्टपूर्ण योजने अंतर्गत तब्बल ३ कोटी ८२ लाख रुपये खर्चाच्या बुद्धविहाराचे काम सध्या दौंड मध्ये सुरू आहे, मात्र या बुद्ध विहाराच्या जागेमध्ये बेवारस प्रेतांचे दफन होत असल्याची धक्कादायक बाब नगरसेवक गौतम साळवे यांनी उघडकीस आणली आहे. नगरपालिकेने याठिकाणी बेवारस प्रेते दफन करण्यास प्रतिबंध करून प्रेते दफन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी साळवे यांनी नगरपालिकेच्या मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

दौंड नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक १ मध्ये बुद्ध विहाराच्या आरक्षित जागेत वेळोवेळी प्रतिबंध करून देखील याठिकाणी बेवारस प्रेते दफन केली जात आहेत. सध्या या जागेत प्रस्तावित बुद्धविहाराचे बांधकाम चालू असताना सदर जागेत बेकायदेशीर रित्या प्रेते दफन करणे चुकीचे व संतापजनक असल्याने संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, सदरची जागा दिनांक २२/ ११/ २०१८ रोजी जरी बुद्ध विहारासाठी आरक्षित झाली असली तरी याठिकाणी बेवारस प्रेते दफन केली जात होती त्याचप्रमाणे नगर परिषदेचा कचरा संकलन करणारा ठेकेदार सुद्धा सदर जागेत बेकायदेशीरपणे कचरा टाकत होता.

दि.१३/८/२०१९ रोजी तत्कालीन मुख्याधिकारी यांना पत्र देऊन सदर जागेत प्रेते दफन करणाऱ्यांवर व कचरा संकलन करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी केलेली होती. परंतु संबंधितांवर कोणतीही कारवाई न करता त्यांना फक्त तोंडी समज देण्यात आली त्यामुळे कचरा संकलन करणाऱ्या ठेकेदाराने कचरा टाकण्याचे बंद केले. त्याचप्रमाणे मा. तहसीलदार व ग्रामीण रुग्णालयाने बेवारस प्रेत दफन करण्यासाठी पर्यायी जागेची व्यवस करण्याचे आश्वासन दिले होते परंतु आजही सर्व बेवारस प्रेते बुद्ध विहाराच्या जागेतच राजरोसपणे दफन केली जात आहेत.

अशा प्रस्तावित पवित्र जागेत बेवारस प्रेते दफन करणे म्हणजे एका ठराविक समाजाच्या भावना हेतुपूर्वक दुखावण्याचे काम राजरोसपणे चालू आहे, संतापजनक कृत्य करणाऱ्या संबंधितांवर नगरपालिकेने कायदेशीर कारवाई करावी अन्या बौद्ध समाजाकडून तीव्र आंदोलन छेडले जाईल असा इशाराही साळवे यांनी निवेदनातून दिला आहे.


निर्भीड बातम्यांचं व्यासपीठ
सहकारनामा
डेली न्युज पोर्टल आणि साप्ताहिकाच्या
प्रथम वर्धापन दिनास
हा र्दि क शु भे च्छा !
शुभेच्छुक -
न्यू अंबिका सांस्कृतिक कला केंद्र
वाखारी(चौफुला)ता.दौंड,जि.पुणे
संचालक-डॉ.अशोकबाबा जाधव
(अध्यक्ष,महाराष्ट्र तमाशा थिएटर चालक संघटना)
संचालिका- जयश्रीताई जाधव
(न्यू अंबिका सांस्कृतिक कला केंद्र,वाखारी ,चौफुला)


लोकप्रिय वृत्तपत्र
निर्भीड बातम्यांचं व्यासपीठ
सहकारनामा
डेली न्युज पोर्टल आणि सप्ताहिकाच्या
प्रथम
वर्धापन दिन
निमित्त हार्दिक शुभेच्छा
आशिष संपतराव शेळके पाटील
(आदित्यराज एन्टरप्रायजेस)


निर्भीड बातम्यांचं व्यासपीठ
सहकारनामा
डेली न्युज पोर्टल आणि साप्ताहिकाच्या
प्रथम वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा!
* शुभेच्छुक *
उर्वी फार्म
संजिवनी ऑरगॅनिक फार्मिंग
संजिवनी निसर्गोपचार प्रशिक्षण संस्था
मेहेर डेव्हलपर्स
बापुसाहेब मेहेर(बिझनेस क्लब ,अध्यक्ष महाराष्ट्र राज्य)


निर्भीड बातम्यांचं व्यासपीठ
सहकारनामा
या डेली न्यूज वेब पोर्टल आणि साप्ताहिकाच्या
प्रथम वर्धापन दिन
हार्दिक शुभेच्छा !
मोतीलाल दिवेकरपाटील (उद्योजक)
पैलवान पप्पुराज हनमघर पाटील(उद्योजक)
चंद्रकांत शिवाजी दिवेकर (उद्योजक)
मच्छिंद्र सपाटे (उद्योजक)
विशाल कुदळे
नाना हनमघर
अक्षय तावरे
वरवंड, ता.दौंड,जि.पुणे


निर्भीड बातम्यांचं व्यासपीठ
सहकारनामा
या डेली न्यूज वेब पोर्टल आणि साप्ताहिकाच्या
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
साप्ताहिक सहकारनामा आणि परिवार